म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणे.

विषय ... बा-वा.

दा. क्र. ८९४

बा. वा.

नों क्र. ८९४

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.

[illegible]

दा. क्र. ८९४ दिनांक ......

विषय किशोर क्र. ३९१

BVBK-0400894

# मास महिमा

ज्येष्ठ ... ग्रंथालय शाखा.
बाल वाङ्मय विभाग
दा. क्र. ...(९४..  दिनांक .....
विषय किशोर क्र. .३९१..

लेखक

कृ. पं. देशपांडे, एम्. ए.

आशीर्वाद

पं. महादेवशास्त्री जोशी

किंमत २–५०

BVBK-0400894

नूतन प्रकाशन, पुणे ३०.

## चार शब्द

'मासमहिमा' ही बारा मराठी महिन्यांचे धार्मिक, सांस्कृतिक, ऐतिहासिक माहात्म्य सांगणारी आणि त्या त्या महिन्याची निसर्ग-वैशिष्टचे डोळ्यासमोर उभी करणारी मालिका आहे. खरं म्हणजे, या सर्व गोष्टी वेगवेगळ्या पुस्तकांत स्वतंत्रपणे आल्या आहेत, त्याच या ठिकाणी एकत्र गुंफल्या आहेत. सोप्या भाषेत मांडल्या आहेत. संकलन, संपादन आणि शब्दांकन माझे आहे.

ही मालिका लिहीत असताना ज्या ज्या संदर्भग्रंथांचा उपयोग झाला. त्यांची यादी पुस्तकाच्या शेवटी दिलेली आहे. या सर्व ग्रंथकारांचा मी अत्यंत ऋणी आहे. या मालिकेला पं. महादेवशास्त्री जोशी यांनी 'आशीर्वाद, दिला आणि या सांस्कृतिक कार्याला प्रोत्साहन दिले याबद्दल मी त्यांचाही ऋणी आहे. तसेच, या मालिकेची कल्पना मांडताच ती स्वीकृत करून, प्रकाशनाची सर्वस्वी जबाबदारी घेतल्याबद्दल मी श्री. जोगळेकरांचाही ऋणी आहे.

माझ्या असंख्य कुमार-वाचकांना ही मालिका आवडेल असा विश्वास वाटतो.

३० (नवा), नारायण पेठ,
पुणे ३०.
१३ मे १९७७

कृ. पं. देशपांडे

---

: प्रकाशक :
गो. के. जोगळेकर
नूतन प्रकाशन,
२१८१, सदाशिव पेठ,
पुणे ४११०३०.

: मुद्रक :
ग. शं. परभाणे
अनमोल मुद्रणालय,
३८३ ब, शनिवार पेठ,
पुणे ४११०३०.

प्रकाशन क्रमांक : ३१
© सौ. शुभदा देशपांडे
प्रथमावृत्ती :
१३ मे १९७७

## आशीर्वाद –

प्रकाशक श्री. जोगळेकर यांनी बारा मासांची बारा पुस्तके प्रकाशित करायची ठरवली आहेत आणि श्री. कृ. पं. देशपांडे हा मासमहिमा सांगणार आहेत. कल्पना अभिनव आहे, स्तुत्य आहे.

बारा महिने म्हणजे कालचक्राचे बारा आरे होत. वेदकाळा-पासून ही कालचक्राची कल्पना प्रस्तुत आहे याचाच अर्थ महिना म्हणजे वर्षाचा बारावा भाग होय. महिना हा सामान्यपणे तीस दिवसांचा असतो. त्याच्या पूर्वार्धाला शुक्ल आणि उत्तरार्धाला कृष्णपक्ष म्हणतात. शुक्लपक्षाच्या शेवटी पौर्णिमा आणि कृष्ण-पक्षाच्या शेवटी अमावास्या येते. हे दोन दिवस महत्त्वाचे समजले जातात. यज्ञसंस्था प्रचलित होती त्या काळात या दोन्ही दिवशी इष्टी करीत. इष्टीची जागा आता वेगवेगळ्या उत्सवांनी आणि पर्वांनी घेतली आहे. यज्ञसंस्थेच्या काळी प्रत्येक मासाची वद्य अष्टमी ही अष्टका या नावाने प्रसिद्ध होती. त्या दिवशी पितरांचे श्राद्ध करीत.

आज आपण चैत्र, वैशाख अशी मासनामे घेतो. ही पद्धत ब्राह्मणकाळी सुरू झाली. त्यापूर्वीची नावे होती ती अशी - मधु, माधव, शुक्र, शुचि, नभ, नभस्थ, इष, ऊर्ज, सह, सहस्य, तप आणि तपस्य. या प्रत्येक मासाच्या वेगवेगळ्या देवता मानलेल्या होत्या. अधिक मासाला मलमास म्हणत. त्याची पुरुषोत्तम ही देवता आहे.

सांप्रतचे चैत्र, वैशाख इ. महिने हे चांद्रमास आहेत. ज्या

पौर्णिमेला चित्रा नक्षत्र येते त्याला चैत्र, ज्या पौर्णिमेला विशाखा नक्षत्र येते तो वैशाख, अशी ही मासगणना आहे.

याशिवाय सौरमासही मानलेले आहेत. मेष संक्रांती ज्या दिवशी होते म्हणजे सूर्य ज्या दिवशी मेष राशीत जातो, तेव्हा-पासून तो वृषभ राशीत जाईपर्यंतचे तीस दिवस हा मेष महिना. असेच पुढेच सगळे.

व्रत, उपवास, पूजा, पर्वस्नान, उत्सव, श्राद्ध, जयंत्या हे सगळे सांस्कृतिक आचार महिन्यांवरच आधारलेले आहेत.

प्रस्तुत पुस्तकात प्रत्येक मासाच्या तिथीचे आणि एकूण त्या त्या मासाचे महत्त्व विशद केलेले आहे. लेखक केवळ धार्मिक आणि सांस्कृतिक तेवढ्याच गोष्टी सांगून थांबत नाहीत, तर त्या-बरोबरच त्या त्या महिन्यातल्या ऐतिहासिक घटनाही वर्णून सांगतात. श्री. देशपांडे यांची वर्णन करण्याची हातोटी चांगली आहे, रंजक आहे मुलांना ती वाचताना कंटाळा न येता पुढे पुढे जावेसे वाटेल. मी या " मासमहिमा " पुस्तकमालेला सुयश चिंतितो.

**–महादेवशास्त्री जोशी**



मासमहिमा **ज्येष्ठ**

सौंदर्याची विकलावस्था सहन करीत, थकलेला, खिन्न झालेला वैशाख दृष्टीआड होतो आणि ज्येष्ठ अवतरतो. या महिन्यातल्या पौर्णिमेला चंद्र ज्येष्ठा नक्षत्रात असतो म्हणून याचे नाव ज्येष्ठ ! ज्येष्ठ म्हणजे श्रेष्ठ, वडील ! दिवस मोठाले असतात. संपता संपत नाहीत. मिनिटे...तास संथपणाने, गजगतीने चालले असतात. मोठा दिवस ! शिवाय मोठ्या माणसांचे प्रौढत्व गंभीरपणा, संथपणा सारेच या महिन्यात सामावलेले असते. यासाठीच तर हा ज्येष्ठ !!

वसंताचे वैभव, त्याचा हसरेपणा, अल्लडपणा सारे लयाला गेलेले आहे. पुष्पसंभार नुकताच सुकू लागला आहे. कोवळी पालवी आता जून झाली आहे. त्यांच्या पोपटी हिरवेपणात आता

काळसरपणा आला आहे. कच्ची फळे आता पिकायला लागली आहेत. झाडांच्या शेंगा निबर व्हायला लागल्या आहेत. सगळीकडे कसा जूनपणा दिसू लागला आहे. प्रौढत्वाच्या खुणा पावलोपावली जाणवू लागल्या आहेत. वाऱ्याच्या झुळकीने हलणारी झाडेही कशी भारदस्तपणे हालताना दिसत आहेत.

आकाशाची निरभ्रता संपली आहे. पांढऱ्या ढगांनी त्याचा ताबा घ्यायला सुरुवात केली आहे. निळ्या पार्श्वभूमीवर ही पांढरी अभ्रटे दिसायला सुरेख दिसतात. यांच्या वाढीबरोबर वातावरण कुंद बनते. मनस्वी उकाडा होऊ लागतो. कधीमधी ओलसर वाऱ्याची झुळूक येईल तेवढीच शीतलता! तरीही अंगाची आग शमत नाही. अगदी सकाळीसुद्धा!! या मेघांनी साऱ्या वातावरणालाच बंदिस्त करून ठेवलेले असते. जणू वाऱ्याला वहायला अन् पानाला हलवायलाही याची परवानगी लागते.

सकाळचे पूर्व क्षितीजही या अभ्रटांनी व्यापलेले असते. सूर्योदयाबरोबर ढगांचे रंग बदलतात. गुलाबी, पिवळी छटा धारण करतात म्हणून आपण कल्पना करायची की, "झाला वरं का सूर्योदय!" नाहीतर सूर्यबिंबही ढगांनीच बंदिस्त करून टाकलेले असते. पूर्वीचा मुक्त संचार, स्वातंत्र्य, स्वैरस्वछंदीपणा सगळ्यालाच या महिन्याने बंदिखान्यात टाकलेले असते.

सूर्य आपल्या वेगाने जात असतो. आभाळाच्या सावलीने ऊन पडत नसते. विरळ ढगातून खाली येणारे काही किरण काचेतून पडलेल्या प्रकाशासारखे दिसतात. सृष्टी या वेगळ्या आवरणाखाली निराळीच दिसते. अंधारातला काळीमाही नसतो आणि कडक उन्हातली प्रखरताही नसते. रंगांच्या वेगवेगळ्या छटा

कशा स्पष्ट जाणवतात. झाडांचाच हिरवा रंग घ्याना! किती विविध छटा दिसत असतात त्यांच्या! आंब्याची पाने जून झालेली असतात. पानांना काळसर हिरवी छटा आलेली असते. त्यात ती धुळीने माखलेली असतात. वेगळाच रंग दिसतो. काही झाडांच्या शेंड्यांना पावसाळ्याआधीच पालवी फुटते. अंजिरी रंगाची! नाजुक नाजुक अंजिरी रंगांची पाने, मध्येच दिसणाऱ्या हिरव्या काड्या आणि पोपटी देठ मन आकर्षून घेतात. वाऱ्यावरती ही पालवी डोलायला लागली की सौंदर्यात आणखी भरच पडते. शिरीषाची झाडेही गर्द काळसर हिरवी ओढणी घेतात. अशोकमात्र पाचूसारखा हिरवागार दिसतो. जास्वंदीच्या हिरव्या रंगात काळी छटाच अधिक तर अडुळसा हिरवाच असतो पण त्याच्या पानांची एक बाजू पांढरट हिरवी दिसते. शेवग्याच्या झाडांनी पोपटी हिरवट पालवी धारण केलेली असते. जिकडे दृष्टी जाईल तिकडे हा हिरवा रंग विविध छटा पांघरून बसलेला दिसेल. त्याच्या त्या वेगवेगळ्या रंग छटा पाहिल्यावर "प्रभू सृष्टीचा रंगारी तऱ्हेतऱ्हेचे रंग भरी" या ओळी सहज नजरेसमोर तरळतील; आणि निसर्ग एक कलावंत आहे याचीही साक्ष पटेल. बारा महिन्यात हा निसर्ग विविध रंग, विविध दृश्य आपल्या डोळ्यासमोर साकारतो. ती विलोभनीय दृश्ये पाहून मन मोहून जाते. त्याच्या कलेचे कौतुक वाटते आणि मस्तक नम्रतेने नत होते.

दुपार दीर्घ असते. तिचा संथपणा चांगलाच जाणवतो; पण या ज्येष्ठातल्या दुपारी काही वेळा मात्र एकदम बदलतात. सकाळी आकाशात हिंडणारे ढग आक्राळ विक्राळ रूप धारण करतात. आपला रंग बदलतात. काळेकुट्ट होतात. राक्षसा

सारखे ! सारे आकाश व्यापून टाकतात. किती झटकन वातावरण बदलते, कल्पनाही येत नाही त्याची. वारा जोरात वाहू लागतो. वारा कसला काहीवेळा वादळच म्हणावे लागते त्याला. झाडे आपले केस पिंजारून डोलू लागतात. अगदी साळू सारखा अवतार दिसतो त्यांचा ! धुळीचे लोट उठतात. चक्राकार गतीने आकाशापर्यंत भिडतात.ढगांचे एकमेकाशी भांडण सुरू होते. ते वाढत जाते. आणि मग कधी सुरुवातीला गारा पडून मग मुसळधार पाऊस कोसळतो तर कधी एकदमच गारांच्या सारखे मोठाले थेंब येतात आणि थोड्याच वेळात उग्र रूप धारण करतात. क्षणात सृष्टी आपले रूप बदलते. आधी तापलेल्या या भूमीवर हा अमृतवर्षाव झाला की, हजारो कमळे फुलल्यासारखा वास सुटतो. हा मृद्गंध मनाला आल्हाददायक वाटतो. थोड्याच वेळात ओहोळ खळाळू लागतात. धरणी सुस्नात होते. जसा वेगाने पाऊस येतो तसाच निघून जातो. भिजलेले पक्षी आपले पंख फडफडवीत झाडांवर बसून कोलाहल करीत असतात. आकाशातले बहुतेक सारे ढग परागंदा झालेले असतात. काही मात्र रेंगाळत तसेच थांबलेले दिसतात. सूर्यास्ताची वेळ येते आणि पश्चिम क्षितीज वेगळ्या रंगाने माखून जाते. राहिलेले काळे ढग तांबडा रंग चढवतात. जणू रक्ताने माखलेला हत्तीच! काही वेळा पश्चिम क्षितीजावरचे ढग पांढरेही असतात. अशावेळी मात्र ते पिवळे दिसतात. त्यांचा पिवळारंग साऱ्या धरतीवर पडतो. जणू विश्वजननीच्या अंगावर पिवळा शालूच घातला आहे.

आता सारी सृष्टी बदलत असते. शृंगार संपलेला असतो. हृदयातले वात्सल्य भरून येत असते. आपल्या चिमण्या पिलां–

साठी सारे पक्षी घरे बांधून तयार असतात. आता मागे पडलेले असतात ते फक्त कावळे. अजूनही जोडीने हिंडून घरट्यासाठी सामानसुमान गोळा करताना दिसतात. बाकीच्यांची घरटी पूर्णावस्थेला गेलेली असतात. पक्ष्यांच्या प्रणयी ललकाऱ्या आता थांबलेल्या असतात. पक्षीणी अंडी घालण्याच्या तयारीत असतात. त्यामुळेच त्यांची पूर्वीची गती मंदावलेली असते. या साऱ्या पक्षी-जीवनावर कुटुंबवत्सलतेची छाया पसरलेली असते.

आसरा मिळालेले पक्षी आपल्या घरट्यात सुखाने विहार करीत आहेत. आता फक्त प्रतीक्षा ! प्रतीक्षा, अंड्यांची आणि त्यातून येणाऱ्या छोट्या छोट्या जीवांची ! ! नवजात पिल्लांची ! !

पोपटीणीची अंडी आपापल्या घरट्यांत पडली आहेत. चिमण्याही त्याच तयारीत आहेत. आपलं जडावलेलं अंग मातीत घुसळीत आहेत. झाडाच्या शेंड्यावर उंच गिरक्या घेणाऱ्या पाकोळ्या थकल्या आहेत. त्या कोठेतरी आता अंडी घालणार आणि जगाचा कायमचा निरोप घेणार. मुंग्यांची वारुळे तयार आहेत. एकेका मुंगीच्या तोंडात एक एक पांढरे अंडे आहे. त्या एका ओळीत चालल्या आहेत. कोठेही धसमुसळेपणा नाही. बेशिस्त नाही. शिस्त त्यांच्या अंगातील रोमारोमात भिनली आहे. शिस्तही अंतरात निर्माण होणारी गोष्ट ! म्हणूनच त्यांना सांगायला, धाक दाखवायला कोणीही नसताना रांग कधी मोडत नाही. सारे कसे शिस्तशीर ! पद्धतशीर ! ! कुंभारीण माशीही झाडाच्या बुंध्याशी घरकुलासाठी प्रयत्न करते आहे. गोल गोल फिरते आहे. येणाऱ्या पावसाळ्यासाठी साऱ्यांनीच आपल्याला निवारा आणि बालकांसाठी आसरा पूर्ण केलेला आहे.

शेतकऱ्यांनी आपापली कामे पूर्ण केली आहेत. नांगरणी, भाजणी संपली आहे. घरे शिवून, शेकारून झाली आहेत. मोठ्या आशेने त्यांचे डोळे आकाशातील पावसाकडे लागले आहेत. धरणी तापून तापून तिच्या हृदयाला तडे गेले आहेत. ऊर फाटून गेला आहे. तीही अमृत वर्षावासाठी आतुर आहे. उत्सुक आहे. पावसाचे स्वागत करायला तीही आनंदाने तयार झाली आहे.

थोड्याच दिवसात पांढरे ढग काळे होतील. पांढरे ढग फसवे असतात. दिसायला सुरेख दिसतात, पण वांझ ! काळ्या ढगात जीवन असते. विजेचे सौंदर्य असते. थोड्याच दिवसात विजांच्या चमचमाटांनी काळे आकाश उजळून जाईल. धरती आनंदी होईल. तिचा आनंद खळाळू लागेल आणि शेतकरीही सुखावतील. ज्येष्ठ म्हणजे, आता जीवनदाता आषाढ लौकरच येत आहे हे गांभीर्याने आणि प्रौढपणाने साऱ्या सृष्टीला सांगणारा महिना ! !

पाऊस वेळच्या वेळी पडावा, सगळी धरणी सुजलां सुफलां व्हावी यासाठी माणूसही प्रयत्नशील असतो. दैवी आशीर्वाद घेण्याचा तो प्रयत्न करीत असतो. देवाच्या आशीर्वादाने समृद्धी येईल अशी त्याची श्रद्धा असते. या महिन्यातला ‘दशहरा’ हे त्याचेच द्योतक नाही का ? ज्येष्ठ शुद्ध प्रतिपदा ते शुद्ध दशमी-पर्यंत हा उत्सव असतो. अनेक ठिकाणी शंकराच्या देवळात लघुरुद्र केले जातात. अभिषेक केले जातात. अभिषेक म्हणजे सतत धार. अभिषेक हे प्रतीक आहे. अभिषेक पात्रातून पाण्याची धार सतत देवावर पडत अगते. तशीच मनाची धार अहर्निश देवावर पडायला हवी. त्याच्या चरणी सतत मन असले पाहिजे. जलाभिषेक म्हणजे आपल्या जाणिवेचा अभिषेक असतो. शंकराची जी अनेक स्तोत्रे आहेत त्यातील एक म्हणजे रुद्र !

रुद्राच्या अकरा आवर्तनांची एक एकादष्णी होते. अकरा एकादष्णीचा एक लघुरुद्र, अकरा लघुरुद्रांचा एक महारुद्र आणि अकरा महारुद्रांचा एक अतिरुद्र ! शंकराच्या भक्तीचा, उपासनेची ही एक पद्धत आहे.

गंगा नदीच्या काठी याच दहा दिवसात गंगोत्सव साजरा करतात. याला ' दशहरा ' असेही नाव आहे. आपला देश शेती प्रधान. साहजिकच पूर्वीपासूनच नद्यांना मानाचे स्थान प्राप्त झाले आहे. गंगेला तर आपण पवित्रतम मानतो. तिला ' गंगा मैय्या ', ' गंगामाता ' म्हणतो. गंगेत स्नान केल्याने आपल्या पापांचा नाश होतो अशी भाविकांची श्रद्धा आहे. म्हणून या उत्सवात भाविकांची प्रचंड गर्दी होते.

गंगानदीबरोबरच ' गंगा लहरी 'ची आठवण येते आणि त्या बरोबरच जगन्नाथ पंडितांचे नाव नजरेसमोर येते. संस्कृत कवींच्या आणि साहित्यशास्त्रकारांच्या परंपरेतला हा शेवटचा थोर कवी. शेवटचा पंडित ! नादमधुर शब्दरचनेसाठी याचे काव्य अत्यंत प्रसिद्ध आहे. त्याची गोडी काय सांगावी. एके ठिकाणी थोडासा आत्मगौरवाचा दोष पत्करूनही तो म्हणतो, " मध, द्राक्षे किंवा प्रत्यक्ष अमृतदेखील ज्यांना विशेष आनंद देऊ शकत नाही, असे काही लोक आपणाला सापडतील एखाद् वेळ, पण जगन्नाथाची वाणी ज्यांना रंजवीत नाही, ते मंदमती मात्र खरोखर जिवंत असूनही मृत असल्याप्रमाणेच होत !" अशी मधुर काव्य रचना करणाऱ्या जगन्नाथ पंडिताने ' गंगा लहरी ' हे उत्तम, प्रासादिक, आंतरिक तळमळीने, भक्तीरसाने ओथंबलेले, अलंकारांनी सजलेले आणि नादमाधुर्याने नटलेले काव्य लिहिले आहे.

गंगा ही माता. तिने आपला उद्धार करावा अशी जगन्नाथाची आंतरिक तळमळ. त्या तळमळीतून शब्द उमटतात, "मी अनाथ, तर तू प्रेमाने ओथंबलेली, पापामुळे मला गतीच उरली नाही, तर तू पुण्यगती प्राप्त करून देणारी आहेस ! मी पडणारा, तर तू विश्वाचा उद्धार करणारी, मी रोगांनी जर्जर, तू तर धन्वंतरी, मी तान्हेला, तर तू दुधाचा सागर, मी बाळ तर तू आई–अशा स्थितीत मी तुझ्याकडे आलो आहे. आता तू योग्य असेल ते कर !" अंतरीच्या ओढीने साद घातल्यावर प्रतिसाद का मिळणार नाही ? असं म्हणतात की, जगन्नाथ पंडित राजवैभवाला कंटाळले. त्यांना उपरती झाली. ते गंगा किनारी आले. गंगेच्या घाटावर बसून त्यांनी 'गंगालहरी'ची रचना करायला सुरुवात केली. जिवीच्या जिव्हाळ्याचे ते रसाळ काव्य ऐकून गंगा एक–एक पायरी वरती आली. शेवटी बावन्न श्लोकांचे काव्य पूर्ण झाल्यावर गंगा बावन्न पायऱ्या वरती आली आणि जगन्नाथाला पावन करून आपल्या पोटात घेतले. अर्थात ही दंतकथा असली तरी त्यातून एवढे मात्र कळून येते की त्यात अंतःकरणातील तळमळ यथार्थाने व्यक्त झाली आहे यात शंकाच नाही.

अशी ही पवित्र गंगा आणि तिचे महात्म्य सांगणारी 'गंगा लहरी' ! या गंगेला अनेक नावे आहेत–

प्राचीन काळी गंगा स्वर्गात होती अशी समजूत आहे. तिच्या स्वर्गातील प्रवाहाला **मंदाकिनी** म्हणतात. तर पृथ्वीवरील तिच्या प्रवाहाला **गंगा** म्हणतात. ती पाताळातही आहे तेथे तिला **भागिरथी** म्हणतात. गंगा ही तीन ठिकाणी आहे, तिचा प्रवाह तीन ठिकाणी आहे म्हणून तिला **त्रिपथगा** असेही म्हणतात.

गंगेत स्नान केल्याने दहा पातकांचे क्षालन होते म्हणून तिला '**दशहरा**' असेही म्हणतात.

पुराणांतरी गंगा नदीच्याबद्दल अनेक कथा आहेत. त्या प्रतीकातून आपल्याला अर्थ शोधता येईल. गंगा नदीचा उगम हिमालयात आहे. साहजिकच पूर्वजांनी ती स्वर्गात राहते अशी कल्पना केली होती. अतिशय कडक थंडीमुळे तिचा प्रवाह गोठून गेला होता. कालांतराने ती शंतनू राजाशी विवाहबद्ध झाली तेव्हा ती पतीबरोबर आर्यावर्तात आली. तिचा प्रवाह आर्यावर्तात खळाळू लागला. 'शंतनू' म्हणजे कल्याणकारी प्रवाह ! तिचा प्रवाह कल्याणकारी, शांत करणारा असा होता. तथापि कालांतराने तिचा प्रवाह हिमालयात पुन्हा लुप्त झाला. सृष्टीतील घडामोडींनी असे होणे सहज शक्य आहे. पुढे हिमालयात लुप्त झालेल्या या प्रवाहाला भगीरथाने महत्प्रयत्नाने पुन्हा आर्यावर्तात आणले. त्यासाठी त्याच्या आधीच्या दोन पिढ्यांनी प्रयत्न केले होते. त्याची तिसरी पिढी ! या प्रयत्नांनी, आपल्याकडे 'भगीरथ प्रयत्न' म्हणजे पुष्कळ प्रयत्न असा शब्दप्रयोग रूढ झाला आहे. इतक्या प्रयत्नांनी पृथ्वीवर आलेली गंगा येताना आपल्याबरोबर हिमालयातला गाळ आणते म्हणून तिच्या भोवतालची जमीन अत्यंत सुपीक झाली आहे. तेव्हा जीवनदात्री अन्नदात्री अशा गंगेस लोकांनी परमपवित्र मानले तर नवल काय ? तेव्हा गंगा येथे आली या पाठीमागे प्रदीर्घ तपश्चर्या आहे. भगीरथ कुळातील तीन पिढ्यांची तपश्चर्या आहे, या 'गंगावतरणा'ची कथाही मोठी मनोरंजक आहे.

फार प्राचीन काळातील ही कथा. इक्ष्वाकु कुलात सगर नावाचा एक सम्राट होऊन गेला. त्याने अश्वमेध नावाचा यज्ञ करायचे

ठरविले. हा यज्ञ करायचा अधिकार सम्राटांनाच असतो. देशोदेशी यज्ञाचा अश्व हिंडतो. त्याला कोणी विरोध केला तर त्याच्याशी युद्ध करून तो अश्व सोडवून आणावा लागतो. म्हणजेच ज्याच्या अंगात भरत वर्षातील कोणत्याही राजाशी लढून विजय मिळविण्याची खात्री असेल असाच राजा हा यज्ञ करीत असे. सगराला साठ हजार पुत्र होते. या वरून त्याच्या सामर्थ्याची सहज कल्पना येऊ शकेल.

सगराने अश्वमेधाचा घोडा सोडला. त्याच्या रक्षणार्थ त्याचे साठ हजार पुत्र निघाले. घोड्याचा अनिर्बंध संचार चालू होता.. हिंडता हिंडता तो कपिल मुनींच्या आश्रमात आला. तेथे तो चरू लागला. मुनींना याची कल्पनाही नव्हती. घोड्या पाठोपाठ सगर पुत्रही तेथे येऊन पोहचले. घोड्याला पाहताच. ' या मुनींनी मुद्दाम हा घोडा ठेवला असावा ' अशी कल्पना करून ते मुनींना वाटेल तसे बोलू लागले. त्या गलबल्याने त्यांच्या ध्यानधारणेत व्यत्यय, आला. सारे पाहून ते संतापले आणि अद्वातद्वा बोलणाऱ्या सगर पुत्रांना त्यांनी शापून भस्म केले.

इकडे यज्ञाचा अश्व अजून येत नाही म्हणून सगरराजा काळजी करू लागला. त्याने आपला नातू अंशुमान् याला त्यांच्या शोधार्थ पाठविले. शोध घेत घेत अंशुमान् कपिल मुनींच्या आश्रमाजवळ आला. मुनींनी त्याला सारी हकीगत सांगताच त्याला अत्यंत वाईट वाटले. त्याने नम्रतेने विचारले.

" मुनीवर, झाल्या गोष्टीला उपाय नाही; तरी यांच्या उद्धाराचा मार्ग सांगावा."

" मुला, याला एकच उपाय आहे. स्वर्गातील गंगेचा प्रवाह जर या जागेवरून जाईल तर यांचा उद्धार होईल."

अंशुमान् त्या उद्योगाला लागला पण काम झाले नाही. त्याचा मुलगा दिलीप. त्यानेही पुष्कळ प्रयत्न केले पण त्यालाही यश आले नाही: पुढे. दिलीपाचा मुलगा भगीरथ याने दीर्घ तपश्चर्या करून गंगेला प्रसन्न करून घेतले. गंगा पृथ्वीवर यायला तयार झाली पण तिच्या मनी शंका उद्‌भवली. " आपण पवित्र. पृथ्वीवर गेलो तर मानवांच्या पापक्षालनाने आपण मलीन नाही का होणार ?" तिने भगीरथाला ही शंका विचारली. त्याने उत्तर दिले, " माते, तुझं म्हणणं खरं आहे पण पृथ्वीवरील थोर ऋषीमुनींच्या पुण्यकर्माने तुला अपवित्रता कधीच येणार नाही. ते आपल्या पुण्याईने तुला पवित्र करतील." गंगेला ते पटले. तरीही शंका होतीच. " आपला भार पृथ्वी कशी सहन करू शकणार ?" तिने भगीरथाला सांगितले. " माझा भार पृथ्वी सहन करू शकणार नाही. त्यासाठी तू शंकरास प्रसन्न करू घे. " भगीरथाने शंकराला प्रसन्न करून घेतले. शंकरांनी गंगेचा भार आपल्या मस्तकी घेण्याचे मान्य केले. ज्येष्ठ शुद्ध दशमीला हा गंगेचा प्रवाह शंकरांच्या मस्तकावर पडला. नंतर ती पृथ्वीवर आली आणि सगरपुत्रांचा उद्धार झाला.

'गंगावतरण' हा तीन पिढ्यांच्या श्रमाचा, चिकाटीचा जिद्दीचा इतिहास आहे. यातून बराच बोध घेता येण्यासारखा आहे. अंगीकृत कार्याला कितीही श्रम पडले तरी न डगमगता ते पूर्ण केले पाहिजे. प्रयत्नांची पराकाष्ठा केली पाहिजे. एखादे काम एका पिढीत पूर्ण होण्यासारखी नसते, तेव्हा त्याचे महत्त्व ध्यानी घेऊन, पुढच्या पिढीनेही ते कार्य नेटाने पूर्ण करण्याचा प्रयत्न केला पाहिजे. 'भगीरथ' प्रयत्न केले पाहिजेत. उच्चतम ध्येय पुढे ठेवून कर्तव्य कर्म केल्यास नराचा नारायण होऊ शकतो.

निश्चयाचे बळ असले की कार्यसिद्धी व्हायला कितीसा उशीर ? तना मनाने एखादे कार्य हाती घेतल्यावर, सर्व निष्ठा, श्रद्धा त्या कार्यासाठी अर्पण केल्यावर अशक्य काय आहे ? सावित्रेने सुध्दा याच निश्चयाच्या जोरावर, श्रद्धेच्या बळावर, जिद्दीवर प्रत्यक्ष मृत्यूशी – यमधर्मराजाशी – सामना देऊन आपला पती परत मिळविला. मृत्यू विरुद्ध प्रेम, मृत्यू विरुद्ध श्रद्धा, मृत्यू विरुद्ध निश्चय आणि जिद्द यांचा तो लढा नव्हता का ? या गुणांच्या बळावरच तिने तो लढा जिंकला नाही का ? भारतीय पतिव्रतेचे स्वरूप दर्शविणारी, पतिव्रतेच्या पुण्याईचे माहात्म्य सांगणारी पौर्णिमा याच महिन्यातली. ज्येष्ठी पौर्णिमा ! सावित्री पौर्णिमा ! वट पौर्णिमा ! !

सावित्री ! मद्रदेशाच्या अश्वपती राजाची कन्या. एकुलती एक ! देवकन्या लाजवील असे लावण्य. राजकुमारांना मोहवील असे तारुण्य ! सुसंस्कारात वाढलेली. मनात पवित्रता. अंतः-करणात निर्भयता आणि चेहऱ्यावर तेजस्विता ! ! असे गुण कोणाला वंद्य होणार नाहीत. राजकुमारांनी मागणी घालायला यावे, प्रेम करायला यावे अन् तेजाने, दीपून जाऊन पूजाच करायला लागावे अशी योग्यता ! सावित्रीला योग्य असा पती येतच नव्हता. पित्याचा सावित्रीवर पूर्ण विश्वास. सुसंस्कारी मुलगी पतीची निवड अयोग्य कशी करील ? राजाने सांगितले, " सावित्री, खरं म्हणजे राजकुमारांनी तुला मागणी घालायची पण तुझ्या रूपागुणामुळे, तेजामुळे ते दीपतात. न्यूनगंड निर्माण होतो त्यांच्या मनात. तेव्हा, मुली तूच तुला अनुरूप असा पती निवड. तुझी निवड चांगलीच असेल. मी त्याच्याशीच तुझा विवाह करून देईन." पित्याच्या आज्ञेने, सावित्रीने आपल्या

वृद्ध मंत्र्याला बरोबर घेतले आणि ती वर संशोधनाला निघाली.

सावित्री परत येते तो पित्या समवेत महालात नारदमुनी बसलेले होते. तिने येताच त्रिकालज्ञ देवऋषी नारदांना आणि पित्याला नमस्कार केला. नारदांनी विचारले, "हं काय...... मिळाला मनाजोगता पती ?"

"मुनीवर, आपण त्रिकालज्ञ. आपणास काय माहीत नसणार ?"

"म्हणून तर आलो येथे"

"म्हणजे...... मुनीवर सावित्रीची निवड... ?" अश्वपती...

"राजा निवड चांगली आहे."

"सावित्री, सांग...कोणाला वर निश्चित केलास... ?"

"तात, शाल्वदेशाचे राजे द्युमत्सेन. राज्य भ्रष्ट झाल्याने सध्या ते वनात असतात, त्यांचा पुत्र सत्यवान हाच रूपागुणाने मला अनुरूप वाटला."

"राजा, सत्यवानाची गुणाने बरोबरी करणारा या त्रिभुवनात कोणी नाही. फक्त एकच गोष्ट..."

"कोणती ..."

"त्याचे आयुष्य आजपासून फक्त एकच वर्ष शिल्लक आहे,"

"छे, छे...मग असला जावई कोण पत्करील ?"

सावित्रीने हे ऐकले पण तरीही शांतपणे ती म्हणाली,

"तात, हा सज्जनांचा मार्ग नव्हे. मी एकदा ज्याला वरले तो दीर्घायू असो वा अल्पायू असो. मी माझ्या अंतःकरणापासून निर्णय घेतला आहे. त्यात बदल होणे कालत्रयी शक्य नाही."

दोघांचाही निरूपाय झाला. सत्यवान सावित्रीचा विवाह झाला. वडील परत गेल्यावर सावित्रीने आपली भारी वस्त्रे, अलंकार काढून ठेवले. तपस्विनीचा वेष परिधान केला. सासु-

सासऱ्यांची सेवाशुश्रूषा करीत, पतीचे मन सांभाळून, सदाचारी वर्तन, इंद्रियदमन करून ती राहू लागली. साऱ्यांनाच प्रिय बनली. जणू वनदेवताच!! दिवस सरू लागले. महिने उलटू लागले आणि सावित्रीची छाती धडधडायला लागली. नारदांनी सांगितलेले भविष्य तिच्या डोळ्यासमोर दिसायला लागले. आता सत्यवान हे काही दिवसांचे सोबती ?

चार दिवस राहिले. काहीही सेवन न करता तिने उपोषण केले. आपली अध्यात्मिक शक्ती वाढविली. वास्तविक चार दिवसांच्या उपोषणाने ती थकायला पाहिजे होती; पण त्या तपश्चर्येने तिची शक्ती दुणावली. ती अधिकच तेजःपूंज दिसू लागली.

शेवटी तो दिवस उगवला. सत्त्व परीक्षेचा ! सत्यवान नेहमीप्रमाणे वनात जायला निघाला. सावित्रीचे मन गलबलले. मनी काहूर दाटले, तिने सांगितले,

"नाथ, आज आपल्याबरोबर मी येणार आहे." सावित्रीने आजपर्यंत कधीही कोणतीही याचना केली नव्हती. तिची इच्छा खरं म्हणजे पुरी करायला हवी होती तथापि, चार दिवसांच्या उपवासाने थकलेल्या सावित्रीला अरण्यातले कष्ट कसे सोसवतील ? सत्यवान काहीच बोलेना. त्याने आपल्या आईवडिलांच्यावर हा निर्णय सोपविला. त्यांच्यापुढेही पेच पडला. अखेर सावित्रीची नम्रता, निर्भयता आणि निर्धार यापुढे त्यांनी हार खाल्ली. सावित्री सत्यवानासमवेत वनात निघाली. किती समाधान वाटले तिला ! छे, समाधान कसले... ? युगायुगाचा विरह होताना... निदान 'त्या' क्षणी आपण आपल्या पतीबरोबर राहू !

सत्यवानाने फळे गोळा केली. लाकडे काढण्यासाठी तो झाडावर चढणार तोच त्याला थकवा आला. शरीर घामाने थबथबले. सावित्रीने ओळखले. सारे ब्रह्मांड आपल्या भोवती फिरते आहे असा तिला भास झाला. क्षणभर तीही अवला झाली. पण दुसऱ्याच क्षणी तिने स्वतःला सावरले, पतीला सांगितले,

" नाथ, आपण थोडावेळ विश्रांती घ्यावी. मग लाकडे तोडता येतील." सत्यवान सावित्रीच्या मांडीवर डोके ठेऊन निजला. त्याला ग्लानी आली. श्वास मंद होऊ लागला. तोच सावित्रीला एक भव्य तेजःपुंज पुरुष येताना दिसला. काळाकभिन्न देह. तांबडी-लाल वस्त्रे त्याच्या क्रौर्यात अधिकच भर घालीत होती. त्याने आपला पाश सत्यवानाचे प्राण हरण करण्याकरता टाकला. ते पाहताच सावित्रीने त्याचे मस्तक खाली ठेवले. त्या महाकाय पुरुषाला वंदन करून विचारले,

" महाराज, आपली काया मानवी नाही. आपण दैवी पुरुष दिसता. कृपा करून आपण कोण ? येथे आपलं आगमन का झालं हे सांगण्याची कृपा कराल ?

सावित्रीचे धैर्य वाखाणण्याजोगे होते. प्रसंगाची पूर्ण कल्पना असूनही न डगमगता तिला आपले ईप्सित पूर्ण करायचे होते. प्रत्यक्ष 'मृत्यूशी' सामना करायचा होता. यमधर्माने "मी यमधर्मराज आहे. सत्यवान हा गुणांचा समुद्रच आहे. त्याचे आयुष्य संपल्याने त्याला नेण्यासाठी मी स्वतः आलो आहे." हे सांगताच तिने त्याला बोलके केले. धर्माच्या गोष्टी ती धैर्याने सांगू लागली. " जिकडे पती तिकडेच पत्नीने जावे हा सनातन धर्म आहे. तप, गुरुभक्ती, पतिप्रेम, आपला अनुग्रह यामुळे माझी गती अकुंठीत आहे. तेव्हा पतीला सोडून मी परत कशी जाऊ ?

शहाणी माणसे सांगतात की, सात पावले चालल्याने किंवा सात शब्द बोलल्याने सज्जनांशी मैत्री होते. मी आपल्याबरोबर पतीमागे येले आहे तेव्हा ही मैत्री व्यर्थ कशी जाईल ? या मैत्रीच्या नात्याने मी आपणास काही विनविले तर आपण ऐकून घ्याल ?

सावित्रीच्या धर्मानुवर्ती, रसाळ, मधुरवाणीचा अखंड प्रवाह चालू होता. स्त्रीधर्म, पातिव्रत्य यावर बोलताना ती यमधर्मालाही आनंदीत करीत होती. तो संतुष्ट होऊन त्याने चार वर दिले. सावित्रीने अद्याप ते मागितले नव्हते. ध्येय पूर्ण झाले नव्हते. अखेर यम म्हणाले, " सावित्री तुझ्या बोलण्याने मी प्रसन्न झालो आहे माग वाटेल तो वर माग."

असे म्हणताच सावित्रीच्या सर्वांगाचे कान झाले असतील. सुकलेल्या वेलीवर फूल उमलले असेल. शिशिरात वसंताचा बहर जाणवला असेल. याचसाठी केला होता अट्टाहास असं तिला वाटलं असेल. तिच्या मुखातून शब्द उमटले असतील.... " महाराज, मला दुसरं काय पाहिजे... माझं दैवत... ते परत मिळालं की स्वर्ग सुखाचीही मला इच्छा नाही. "

हे ऐकून सावित्रीच्या वाक्चातुर्याने हरलेल्या यमालाही आनंद झाला. तृप्त, कृतार्थ आणि आनंदी मनाने त्याने सत्यवानाचे प्राण परत दिले. सावित्रीला जीवन सर्वस्व परत मिळाले. अमृताचा ठेवा पदरी पडला. यमधर्मराजाने आधी दिलेले वरही मागून घ्यायला सांगितले. " सासू सासऱ्यांना राज्य, श्री प्राप्ती त्यांना दृष्टी, आपल्या पित्याला पुत्र प्राप्ती आणि स्वतःलाही " तिने मागणं मागितलं, यमधर्माने उदार मनाने ते दिले.

ती सत्यवानाजवळ आली. त्याचे मस्तक पुन्हा मांडीवर घेतले पतिव्रतेच्या प्रेमळ पण प्रभावी स्पर्शाने गेलेले चैतन्य परत आले.

सत्यवान जिवंत झाला. यमधर्माच्या औदार्याची प्रशंसा करीत तृप्त मनाने सावित्री पतीसमवेत घरी निघाली आणि यम धर्मराज...? त्या पतिव्रतेच्या धार्मिकतेचे, पतिनिष्ठेचे, वाक्-चातुर्याचे...छे...कितीतरी गुणसमुदायांचे कौतुक करीत दक्षिण दिशेकडे चालत होते. त्यांचा हा 'हार' हा त्यांना 'विजयी' वाटत होती.

सावित्री घरी आली. यमधर्मराजाच्या वराप्रमाणे साऱ्या गोष्टी लवकरच घडून आल्या. देवाची वाणी खोटी कशी ठरेल? मुलीदेखील उभय कुळांचा उद्धार करतात तो असा–

असामान्य काव्य असणारी ही कथा कितीतरी गोष्टी सहज सांगून जाते. सत्यवान सावित्रीच्या गुणांनी, त्यांच्या प्रेमाने ही कथा उजळून निघाली आहे. या कथेतील सावित्री आणि यमधर्मराज यांचा संवाद एक रूपक आहे. जगात मानवावरती अकल्पित दुःखाचे प्रसंग येतात. तथापि ते आले असताना न डगमगता संकटाशीच नव्हे तर प्रत्यक्ष मृत्यूशीही तोंड द्यायची आपली तयारी पाहिजे. हे सांगण्यासाठीच तर या कथेची निर्मिती ! पुरातन काळी आर्य स्त्रिया ज्ञान आणि निष्ठा यांच्या जोरावर प्रत्यक्ष मृत्यूलाही हार न जाता स्वतःचे ध्येय संपादन करण्यात किती तत्पर होत्या हेच सावित्रीची कथा सांगत नाही का ? विवाहासमयी मुली मोठ्या होत्या. समंजस, सुशिक्षित होत्या. सावित्रीने आपला पती स्वतः निवडला होता. तिने संसारही कसा उत्तम केला होता. वृद्धांची सेवा, पतिप्रेम, परि-स्थितीनुरूप आचरण हे गुण आजही घेण्यासारखे नाहीत का ? माहेरची श्रीमंती, पण सासरी येताच सावित्री श्रीमंती डामडौल सोडून देते. 'आपलं घर' जसं असेल तसं रहायला

नको का ? तसं बनायला, वागायला नको का ? सावित्री आपल्या संसारात विरघळून गेली. एकरूप झाली. पतिपत्नी दोघांनीही असं एकमेकांच्या जीवनात विरघळून गेल्यानेच संसाराची गोडी वाढेल हे सांगणारी कथा म्हणजे सावित्रीची कथा !

या पौर्णिमेच्या दिवशी स्त्रिया व्रताचरण करतात. आपल्या पतीच्या आयुष्याची दोरी अकाली तुटू नये यासाठी हे व्रत ! उपोषण आणि वडाच्या झाडाची पूजा हा मुख्य भाग. वट वृक्षाच्या खाली सत्यवान् मृत झाला आणि त्याच झाडाखाली त्याला सावित्रीच्या पुण्याईने पुनर्जन्म लाभला म्हणून वडाच्या झाडाची पूजा करायची. खरे म्हणजे या दिवशी सावित्रीची पूजा होणे आवश्यक आहे. पूजा म्हणजे केवळ व्यक्तिपूजा नव्हे तर गुणांची पूजा ! **गुणांची पूजा गुणांच्या आचरणाने होते. सावित्रीचे गुण अंगी उतरविण्याचा प्रयत्न झाला तर घराघरातून नंदनवने फुलतील. प्रेमाचे झरे खळाळतील. आणि प्रत्येक स्त्री आनंदाने म्हणेल. 'सुख आले माझ्या दारी। मज काय कमी या संसारी.'**

प्रांतपरत्वे या व्रताच्या रुढीत फरक आहे, बंगाल प्रांतात या दिवशी पतिपूजा करतात. सुगंधी तेल लावतात. स्नान घालतात. चंदनाची उटी लावतात. पतीला पुष्पहार घालतात. पुष्पगुच्छ समर्पण करतात. नववस्त्र देतात. दक्षिण हिंदुस्थानात मात्र हा प्रकार रूढ नाही.

ज्येष्ठी पौर्णिमेला ओरिसात, जगन्नाथपुरीला स्नानयात्रा भरते. सतरा दिवस हा उत्सव चालू असतो. या दिवशी जगन्नाथाने अवतार घेतला असे मानतात. सर्व भाविकांना देवाचे जवळून दर्शन घेता येते म्हणून ही यात्रा खूपच लोकप्रिय आहे. दूर-

दूरच्या प्रांतातून लाखो लोक या यात्रेसाठी येत असतात. स्नानाच्या दिवशी सूर्योदयापूर्वी जगन्नाथाच्या मूर्तीला तटाजवळ उंच जागेत बसवितात. सुगंधी तेले लावून स्नान घालतात. या स्नानविधीवरूनच या उत्सवाला 'स्नानयात्रा' असे समर्पक नाव पडले आहे. मूर्ती रथात घालून मिरविली जाते. अनेक भाविक हा 'जगन्नाथाचा रथ' भक्तीभावाने ओढत असतात.

'भक्ती' हा भारतीयांचा विशेष ! भक्तीने सामर्थ्य निर्माण होते आणि सामर्थ्याने विजय प्राप्त होतो. आपली बाजू केवळ सत्य असून भागत नाही. सत्याचाही जय व्हायचा असेल तर सामर्थ्याची आवश्यकता आहे. रामायणातील सुग्रीव आणि वाली हे दोघे प्रसिद्ध बंधू ! सुग्रीवाची बाजू सत्याची न्यायाची होती तरी प्रभू रामचंद्राच्या सामर्थ्याची जोड त्याला जोपर्यंत मिळाली नव्हती तोपर्यंत सुग्रीवाचा विजय होऊ शकला नाही.

सुग्रीव हा किष्किंधेचा राजा. वाली हा त्याचा भाऊ. तो कामान्ध झाला. धर्माला सोडून आचरण करू लागला. त्याने सामर्थ्याच्या जोरावर सुग्रीवाचे राज्य हिसकावून घेतले. त्याची बायको पळविली. या निंद्य कृत्याचे प्रायश्चित्त त्याला द्यायला हवे होते.

एके दिवशी सीतेचा शोध करीत करीत राम आणि लक्ष्मण शबरीचा पाहुणचार घेऊन ऋष्यमूक पर्वताकडे येत असताना पंपा सरोवराकाठी आले. या पर्वतावर सुग्रीव वालीच्या भीतीने लपून बसला होता. त्यांना पाहताच, 'वालीने तर यांना पाठवले नसेल ना ?' या शंकेने सुग्रीव व्यथित झाला. त्याने हनुमंताला या दोघांचा शोध घ्यायला सांगितले. श्रीराम आणि हनुमान या दोघांची भेट पंपासरोवराकाठी ज्येष्ठ शुध्द प्रतिपदेला

झाली. श्रीरामांच्या दृष्टीने ही भेट महत्त्वाची होती. हनुमंताने सर्व माहिती मिळवून आणि सुग्रीवाची माहिती देऊन उभयतांचा स्नेह हा एकमेकांच्या फायद्याचा होईल असे सांगितले. सुग्रीव राज्यावर आल्यावर तो सीता शोधाच्या कार्यात मदत करील असे सांगितले. त्यानुसार श्रीराम लक्ष्मणासमवेत ऋष्यमूक पर्वतावर गेले. अग्नीला साक्षी ठेवून सुग्रीव व श्रीराम यांचे सख्य झाले. या सख्याचे वर्णन महर्षी वाल्मिकींनी अतिशय सुरेख केले आहे. स्त्रियांचा वामनेत्र स्फुरण पावला तर तो शुभसूचक असतो आणि पुरुषांचा तोच नेत्र स्फुरण पावला तर अशुभ असतो. महर्षी सांगतात, " सुग्रीव आणि राम यांच्या सख्य प्रसंगाच्या वेळी, सीतेचे कमलाप्रमाणे, वानराचे (वालीचे) सुवर्णाप्रमाणे आणि राक्षसाचे (रावणाचे) अग्नी ज्वालेप्रमाणे असणारे असे तिघांचेही वामनेत्र एकाच वेळी स्फुरण पावू लागले. "

श्रीरामांचे सख्य होताच ठरल्याप्रमाणे सुग्रीवाने वालीला पुन्हा युद्धाचे आव्हान दिले. आता सुग्रीवाच्या गर्जनेला सामर्थ्याचा पाठींबा होता आणि आत्मविश्वासाचा आवेश होता. तो गगन-भेदी आवाज ऐकताच रंगमहालात मग्न असणारा वाली युद्धाला निघाला. त्याच्या पत्नीने-तारेने त्याला सांगितले, " स्वामी, ज्या अर्थी सुग्रीव पुन्हा प्रचंड नाद करून युद्धाला आव्हान करतो आहे त्या अर्थी त्याच्यामागे कोणीतरी सामर्थ्यवान माणूस उभा आहे. आपण युद्धाला जाऊ नये. " वालीने ते बोलणे ऐकले नाही. मदमस्त झालेल्याला हिताचे बोलणे रुचत नाही. तो युद्धाला आला. सुग्रीव आणि वाली यांतील फरक ओळखू येण्यासाठी सुग्रीवाच्या गळ्यात गजवेलीची माळ घातली होती. युद्धाच्यावेळी श्रीरामांनी झाडाआडून वालीला बाण मारला. बाण वर्मी

लागल्याने तो निष्प्राण झाला. वालीचा वध ज्येष्ठ शुद्ध अष्टमीला झाला.

झाडाआडून बाण मारल्याबद्दल वालीने श्रीरामांना दूषणे दिली. रामाने त्याचे दोष त्याच्या पदरात घातले. ते त्यालाही पटले. श्रीरामांनी सांगितले " मी धर्माचे पालन केले. तुझा वध नाही, तर या निमित्ताने खलनिर्दालन झाले आहे." श्रीराम काय किंवा अन्य अवतार काय अधर्माचा, अनीतीचा नाश करून खऱ्या धर्माची प्रतिष्ठापना करण्यासाठीच कार्यरत असतात. थोर महात्म्ये–संत–यांचेही जीवनकार्य तेच असते.

तेराव्या शतकात ज्ञानेश्वर आणि त्यांच्या भावंडांनी भागवत धर्माच्या संघटनेचे कार्य केले. जन जागृती केली. धर्माची वाट स्त्री–क्षूद्रांना दाखविली. आपले अवतार कार्य झाले असे वाटताच ज्ञानदेवांनी संजीवन समाधी घेतली. ते पाहताच त्यांचे गुरू, बंधू निवृत्तीनाथही हेलावले. ज्येष्ठाच्या आधी कनिष्ठाचे जाणे झाले. वळचणीचे पाणी आढयाला गेले.' नंतर सोपानदेव, मुक्ताई यांनीही अवतार कार्ये संपविली. आता निवृत्तीनाथांचे तरी इहलोकी काय राहिले होते ? ते रस्ता कापू लागले. वाटेत सप्तशृंगीचा डोंगर लागला. त्याला प्रदक्षिणा घातली. देवीचे दर्शन घेतले. पावले पुन्हा चालू लागली. त्र्यंबकेश्वर ! पावले थकली. मनही थकले होते. आता शरीराचा मोह कशाला. निवृत्तीनाथांनी ज्येष्ठ वद्य द्वादशीला समाधी घेतली. सारी भावंडे केवळ आठ महिन्यात परमेश्वरस्वरूपाशी विलीन झाली. अवघ्यांना दुःख झाले. सगळे संतमंडळ गहिवरले, हेलावले. नेत्रींच्या अश्रूतून अंतःकरणीचे प्रेम वाहीलें. नामदेवासारखा ज्येष्ठ संत पण दुःखाने

ओलावला. गहिवरल्या मुखी म्हणाला "लोपलासे भानु पडला अंधार। गेला योगेश्वर निवृत्तीराज ॥"

ज्ञानेश्वरांनीही गुरु करावे. संतांनी योगीराज म्हणावे ही निवृत्तीनाथांची योग्यता! 'ज्ञाना'ला त्यांनी घडविले. त्याच्या मनाचा तोल सावरला. त्याला 'ज्ञानराज' केले. आणि ज्ञानेश्वरांनीही आपल्या गुरूंचा गौरवपूर्ण उल्लेख अनेक वेळा केला. गुरुशिष्याची ही एक महान जोडी होऊन गेली. ते गेले, त्यांचे कार्य चालू राहिले. समतेचा उपदेश सगळीकडेच दुमदुमून राहिला. मतामतांचा गलबला कमी व्हावा यासाठी केलेले प्रयत्न चिरायू झाले. आणि एका अर्थानें हेच कार्य महात्मा कबीरांनी उत्तर हिंदुस्थानात केले. त्यांचा जन्मही ज्येष्ठातला. ज्येष्ठ शुद्ध पौर्णिमेचा!

कबीरांच्या जन्मासंबंधी एकमत नाही. एक दंतकथा आहे. रामानंदाच्या आशीर्वादाने एका विधवा ब्राह्मण स्त्रीला जो मुलगा झाला तो म्हणजेच कबीर! जनलज्जेला भिऊन त्या स्त्रीने त्याचा त्याग केला. तो एका कोष्टयाला सापडला. नीरू त्याचे नाव. त्यानेच कबीरांना लहानाचे मोठे केले. त्यांचे लग्नही करून दिले. लोई हे त्यांच्या पत्नीचे नाव. कमाल व कमाली अशी त्यांना दोन मुलेही होती. त्यांना त्यांच्या भक्तीमुळे, काही ठाम मते मांडल्यामुळे फारच त्रास सहन करावा लागला. त्यावेळच्या सिकंदर लोदीने तर त्यांचे हातपाय बांधले आणि त्यांना गंगेत फेकून दिले होते. त्यांची भक्तीभावना श्रेष्ठ होती, परमेश्वरी कृपेचा वरदहस्त त्यांच्या मस्तकी होता म्हणूनच ते वाचले.

त्या काळी मतामतांचा गलबला माजला होता. सामाजिक विषमता वाढली होती. ज्ञान हा ब्राह्मणांचाच मक्ता झाला होता इतर लोक अज्ञानी राहिले होते. हिंदुमुसलमानांत तीव्र मतभेद होते. धर्माच्या नावावर अधर्म माजून राहिला होता. रूढींचे प्राबल्य माजले होते. सगळीकडे अंधार पसरला होता. बहुजन समाज त्या अंधारात चाचपडत होता. कबीरांनी या समाजाला योग्य मार्ग दाखविला. विषमता कमी करण्याचा प्रयत्न केला. 'राम' आणि 'रहीम' हे एकच आहेत असे प्रतिपादन केले, भक्तीचा प्रसार केला. आपल्या तत्त्वप्रतिपादनाठी साऱ्या भारतभर भ्रमण केले. एकतेचा आणि भक्तीचा संदेश देऊन साऱ्यांनाच ज्ञानदीप दाखविला.

ज्ञानाचा दीप लावण्यासाठी, खऱ्या धर्माची ओळख करून देण्यासाठी भारतभर भ्रमण करणारे, एवढेच नव्हे तर हिंदू धर्म भारतीय तत्त्वज्ञान यांचे उज्ज्वल रूप साऱ्या जगाला दाखवून देणारे, पटवून देणारे थोर तत्त्वज्ञानी, उत्कृष्ट वक्ते स्वामी विवेकानंद याच महिन्यात जेष्ठ वद्य षष्ठीला समाधिस्त झाले.

त्यांचे मूळ नाव नरेंद्र दत्त. कॉलेजमध्ये शिकत असताना त्यांनी भारतीय तत्त्वज्ञानाचा आणि पाश्चात्त्य तत्त्वज्ञानाचा अभ्यास केला. प्रारंभी त्यांचा कल बुद्धिवादाकडे होता पण केवळ बुद्धिवादाने समाधान होईना. जीवनाचे कोडे उलगडेना, मनाच्या या तळमळीतच एके दिवशी रामकृष्ण परमहंसांची गाठ पडली. प्रथम भेटीतच अंतःकरण निवले. शांत झाले. त्यांनी परमहंसाचे शिष्यत्व पत्करले. साधना केली. संन्यास, सर्व धर्माबद्दल ऐक्य, बुद्धी आणि मग ईश्वरप्राप्ती हा त्यांचा साधना क्रम होता. साधना पूर्ण झाल्यावर परमहंसांच्या समाधीनंतर

त्यांनी सहा वर्षे भारत भ्रमण केले. नंतर जागतिक धर्मपरिषदे-साठी अमेरिकेला जाण्याचा योग आला.

धर्मपरिषदेच्या व्यासपीठावर वेगवेगळ्या धर्मांचे प्रतिनिधी आलेले होते. सभा सुरू होण्यापूर्वी सर्वांनी आपले धर्मग्रंथ व्यास-पीठावरील टेबलावर ठेवावेत असे सांगण्यात आले. पण सर्वात आधी म्हणजे सर्वात खाली, आपला धर्मग्रंथ ठेवणार कोण ? विवेकानंदांनी आपला धर्मग्रंथ खाली ठेवला. साऱ्यांनाच आश्चर्य वाटले. बाकी सारे ग्रंथ नंतर भराभर त्यावर आले. स्वामींची भाषणाची वेळ आली. त्यांनी भाषणाला सुरुवात केली, "माझ्या अमेरिकेतील बंधूंनो आणि भगिनींनो" हे ऐकताच टाळ्यांचा कडकडाट झाला. हे संबोधन वेगळे होते. हे नाते आगळे होते. हे शब्द निराळे होते. मग स्वामींनी धर्मग्रंथ काढला. बाकी सारे ग्रंथ धडाधड कोसळले. स्वामींनी सांगितले, "माझा हिंदु धर्म हा असा पाया सारखा आहे. त्यावरच साऱ्या धर्मांची इमारत उभी आहे." नंतर स्वामींनी अस्खलित तेजस्वी भाषण करून साऱ्यांनाच प्रभावित केले. मंत्रमुग्ध केले.

स्वामींनी इंग्लंडमध्येही दौरा केला. भगिनीनिवेदितेसारख्या शिष्या त्यांना मिळाल्या. भारतात आल्यावर त्यांनी कलकत्त्या-जवळ बेलूर येथे व हिमालयात मायावती येथे रामकृष्ण मठाची स्थापना केली. आपल्या वेदांताला जनसेवेची जोड दिली. जन सेवा हीच ईश्वर सेवा असे मानले. प्लेग, दुष्काळ अशावेळी या मठांतर्फे मदत केंद्रे सुरू झाली.

आज कन्याकुमारी येथे स्वामीजींचे शीलास्मारक वैभवाने उभे आहे. भारतीयांचेच नव्हे तर परदेशीयांचेही ते एक पवित्र तीर्थक्षेत्र बनले आहे. स्वामींचे दिव्यजीवन आणि हिंदूधर्माचे

माहात्म्य त्या स्मारकाभोवती खळाळणाऱ्या लाटा आपल्या धीर-गंभीर आवाजात सांगत असतात. धर्माची महती गात असतात. ‘ ईश्वर साक्षात्कार ’ म्हणजे धर्म हे सांगत असतात.

द्रष्टया लोकांना हा ईश्वराचा साक्षात्कार निरनिराळ्या ठिकाणी होऊ शकतो. देशाभिमान आणि देशसेवा यातही ईश्वरी साक्षात्कार घडू शकतो. देश हाच देव मानला तर हे अशक्य नाही. या संदर्भात राणा प्रतापाचे नाव कोण विसरेल ? राणा प्रतापाचा जन्म ज्येष्ठ शुद्ध प्रतिपदेचा ! अतुल पराक्रमी, आत्यंतिक स्वार्थत्याग, मूर्तीमंत देशाभिमान आणि प्रखर धर्माभिमान म्हणजे राणाप्रताप !

अकबराने रजपुतांची राज्ये घशात घातली होती. आणि चितोडचे राज्य परत घेणे हे राण्याचे ध्येय होते. आपले ध्येय पूर्ण होईपर्यंत तो बिछान्यावर न झोपता तृणशय्येवर झोपत होता. सोन्यारुप्याच्या ताटाऐवजी पत्रावळीवर जेवत होता. आपल्या ध्येयासंबंधी त्याची ही निष्ठा होती. अकबराने त्याच्या धाडसाकडे पाहून सांगितले. “ तू मला शरण ये. मी तुला राज्य देतो ” पण शत्रूला शरण जाऊन राज्य मिळवायचे ? स्वाभिमानी माणसाला हे कसं सहन होणार ? अन् त्यात कोणता पराक्रम...? राण्याने अभिमानाने सांगितले. “ राज्यासाठी शत्रूला शरण येऊन रजपूत कुल कलंकित करणार नाही. ”

हे देशाभिमानाचे, कुलाभिमानाचे उत्तर अकबराला कसे पटणार ? त्याने आपला पुत्र सलीम याला राण्यावर स्वारी करायला पाठविले. हळदी घाटाच्या खिंडीत या दोघांचे युद्ध झाले. ते ज्येष्ठ शुद्ध द्वितीयेला. (३० मे १५७६) यात राण्याचे अपरमित नुकसान झाले. राण्याचा अतुल पराक्रम कमी पडला. चौदा हजार सैन्य

कापले गेले. अशा आणीबाणीच्या स्थितीत राण्याच्या चेतकचे खरे कौतुक ! त्याने आपल्या धन्याला जीवात जीव असेपर्यंत वाचविले. एकदा तर दुथडी वाहणाऱ्या ओढ्याच्या पार उडी टाकून धन्याचे रक्षण केले. राण्याला वनात आणले. सततच्या श्रमाने तो थकला होता. एवढ्यात फितुर झालेला राण्याचा भाऊ पश्चात्ताप दग्ध होऊन राण्याकडे परत आला. धन्याला मिळालेला हा आधार चेतकने भरल्या डोळ्याने पाहिला आणि धन्याच्या पायाशी प्राण सोडला. ही स्वामीनिष्ठा ! ! त्याचे स्मारक का होणार नाही ? स्वामीभक्त चेतकचे स्मारक एक चबुतरा बांधून करण्यात आले.

स्वातंत्र्याची चाड असणारा, मोडेन पण वाकणार नाही या बाण्याचा, चितोडच्या स्वातंत्र्याचा ध्यास घेणारा अतुल पराक्रमी असा हा राणाप्रताप ! !

महाराष्ट्राला स्वतंत्र करण्याचा असाच ध्यास छत्रपती शिवाजी महाराजांनी घेतला होता. त्यांनाही देशसेवेत ईश्वरी साक्षात्कार झाला. पारतंत्र्यात खितपत पडलेल्या लोकांना स्वातंत्र्याचा प्रकाश दाखवून त्यांची उन्नती करण्यात ईश्वराचा साक्षात्कार आहे, धर्माची प्रतिष्ठा आहे असं छत्रपती शिवाजी महाराजांना जाणवलं. गोब्राह्मण प्रतिपालन, गो म्हणजे समृद्धी आणि ब्राह्मण म्हणजे ज्ञान; समृद्धी आणि ज्ञान यांचे प्रतिपालन हेही क्षात्रधर्माचे कर्तव्य आहे हे त्यांना भावले, म्हणूनच वयाच्या केवळ पंधराव्या वर्षी स्वराज्य स्थापनेच्या खडतर व्रताला त्यांनी सुरुवात केली. स्वराज्य स्थापना करणे, शून्यातून विश्व साकारणे ही साधी गोष्ट नव्हती. अनंत अडचणी, असंख्य यातना यांना तोंड देत देत काटेरी मार्गावरून त्यांना चालायचे होते; पण महाराजांनी हे पत्करले होते. हे सतीचे वाण त्यांनी घेतले होते.

स्वराज्याचे तोरण उभारले. कणाकणाने ते वाढू लागले. ते पाहून विजापूरचा बादशहा संतापला. आपल्या एका सरदाराचा मुलगा असं बंड करतो? आमचे पाश एवढे भक्कम असताना स्वातंत्र्य स्थापनेच्या वल्गना करतो. आणि त्याची आई त्याला साथ देते? फितवते? तिचे नाक आमच्या हाती असताना? तिचे कुंकू आपल्या पंजात असताना? कोणत्याही क्षणी... तलवारीच्या एका फटकाऱ्यात ... नाहीसं होईल म्हणावं! आणि खरोखर बादशहाने शहाजीराजांना कैद केलं. जिजाबाईंना रोकडा सवाल होता "बोल तुला काय हवं सौभाग्य की स्वातंत्र्य?" महाराजांपुढेही प्रश्न होता "पित्याची मुक्तता का स्वातंत्र्याची जिद्द?" महाराज खरेच धीराचे. मुत्सद्दीपणाची यावेळी त्यांनी कमाल केली. त्यांनी औरंगजेबाला मधाचे बोट लावले. "आम्ही पितापुत्र आपल्या पदरी येऊ इच्छितो. अडचण एकच आहे आमच्या तीर्थरूपांना विजापूरकरांनी कैद केली आहे." कळ बरोबर फिरली. काट्याने काटा निघाला. शहाजींची मुक्तता झाली. ज्येष्ठ शुद्ध पौर्णिमेच्या दिवशी! वटपौर्णिमेला!! महाराजांनी आपल्या असामान्य बुद्धिमत्तेने आपल्या आईचे सौभाग्य मरणाच्या उंबरठ्यातून परत आणले. राजकारणातला हा असामान्य डाव यशस्वी केला. त्यावेळी त्यांचे वय होते अवघे अठरा वर्षांचे.

अशा एक ना दोन असंख्य आपत्तींना तोंड देत देत, शक्तीने आणि युक्तीने कार्य साधून स्वराज्याचे शिल्प साकारले होते. शून्यातून स्वराज्य उभे राहिले होते. राजाचे प्रजेवर आणि प्रजेचे राजावर नितांत प्रेम होते. सुराज्य दारी आले होते. सारे तृप्त होते. धर्माची प्रतिष्ठापना झाली होती, पण महाराज

सिंहासनाधीश्वर नव्हते. ‘ राजे ’ झाले नव्हते. मराठी सिंहासन निर्माण झाले नव्हते. मोगल शिवाजीच्या या उद्योगाला पुंडपणा समजत होते. डच, पोर्तुगीज, इंग्रज यांची दृष्टीही अशीच होती. मातब्बर मराठे सरदार या उद्योगाकडे तुच्छतेने पहात होते. ‘ राजा ’ मानायला कोणीच तयार नव्हते. धर्माचे अधिष्ठान म्हणून शिवाजीला किंमत नव्हती. धर्माज्ञा काढण्याचा अधिकार नव्हता. त्यासाठी सिंहासनाधीश्वर होण्याशिवाय इलाज नव्हता. हाच एकमेव उपाय होता.

आणि याचवेळी...वाराणशीत एका विद्वान ब्राह्मणाच्या मनात एक कल्पना विजेसारखी चमकली. लख्कन ! तेजस्वी! ! “ हिंदूंचे सिंहासन झाल्याशिवाय तरणोपाय नाही,”

गागाभट्ट ! विद्वान, शिरोमणी. पंडित ! त्यांना जाणवले हिंदूंचे सिंहासन व्हायला हवे. त्यांच्या कानी छत्रपतींची स्वराज्य स्थापनेची कामगिरी होतीच. त्यांनी दक्षिणेची वाट धरली. ‘ शिवाजीला तुम्ही सिंहासनाधीश्वर व्हा ’ असे सांगण्यासाठी हा विद्वान काशीहून रायगडी आला. महाराजांना हे कळले. त्यांनी त्यांचे स्वागत केले. मनोदय ऐकला. केवढा आनंद दाटला ! साऱ्यांचे चेहरे आनंदाने फुलले. रायगडाचा कण नि कण आनंदला. अमृतसिद्धी योग आला. महाराष्ट्राला राजा मिळणार. महाराज सिंहासनाधीश्वर होणार. मां साहेबांचा ‘ शिवबा ’ छत्रपती होणार ! सारेच आनंदात नहात होते. शब्दांत कसे सांगणार ?

पण राज्याभिषेक करणे इतके सोपे नव्हते. महाराष्ट्राची ती परंपरा चारशे वर्षे खंडित झाली होती. सर्व काही नव्याने करायचे होते. राज्याभिषेक तंत्रही नवे होते. बऱ्याच शतकात

असा समारंभ झाला नव्हता. या समारंभाला संपूर्ण धार्मिक अधिष्ठान असले पाहिजे. वेदकालापासूनची भव्य परंपरा त्याला असली पाहिजे, प्रभू रामचंद्रांचा उज्ज्वल, दिव्य वारसा त्याला लाभला पाहिजे, यासाठी गागाभट्टांनी खूप परिश्रम घेतले. वेद, शास्त्र, पुराणे, रामायण, महाभारत, जुने राज्याभिषेकांचे तपशील. साऱ्यांचा अभ्यास करून 'शिवराज्याभिषेक प्रयोग' या ग्रंथाची निर्मिती केली. मूळ मुद्दा होता महाराज क्षत्रीय आहेत की नाहीत? गागाभट्टांनी प्रदीर्घ उद्योग आरंभिला. उदेपूर, जयपूर आदि अनेक रजपूत राजांच्या वंशावळी अभ्यासल्या आणि शोधान्ती जाहीर केले की महाराजांचे भोसले घराणे थेट उदेपूरच्या शिसोदे घराण्याचीच शाखा आहे. ते क्षत्रीय आहेत.

त्यांना केवळ 'क्षत्रिय' होऊन चालणार नव्हते. कारण क्षत्रिय म्हटले की, जन्मापासूनचे सारे संस्कार वेदमंत्राच्या उच्चारात व्हायला पाहिजेत. उपनयन व्हायला पाहिजे होते आणि नंतर विवाह वगैरे. आणि सगळा प्रश्न होता तो येथेच ! महाराजांचे एकच नव्हे तर अनेक विवाह झाले होते. सुना, जावईसुद्धा आले होते. पण गागाभट्ट खरोखर विद्वान. सगळ्या शंकांचे निरसन झाले. सगळ्या प्रश्नांवर तोडगे निघाले. रायगड गजबजला. तयारी सुरू झाली महाराजांच्या राज्याभिषेकाची!!

महाराजांनी सारी तयारी पाहिली आणि त्यांना एक गोष्ट खटकली. सगळी तीर्थे तेथे आली होती. सगळ्या जलांनी अभिषेक होणार होता, पण एक न्यून होते. महाराज उठले. पाचाडला गेले. तीर्थांचे तीर्थ तेथे होते. मां साहेब !! त्यांच्याशिवाय अभिषेक होणार कसा ? महाराजांनी नमस्कार केला. "बाळ शिवबा" येण्याचं कारण त्या वृद्ध नेत्रांना आधीच समजलं

होतं. डोळ्यातून अश्रू धारा खळाळू लागल्या. महाराजांचा खरा अभिषेक हाच होता. अश्रूही कृतार्थ झाले होते. ते म्हणत होते, 'शिवबा याचसाठी अट्टाहास केला होता.' मांसाहेबांना आज जन्माचे सार्थक झाल्याचे वाटत होते.

मांसाहेब रायगडी आल्या. शिवबा 'राजा' झालेला पाहण्या-साठी ! आणि नंतर एक एक समारंभाला सुरुवात झाली.

ज्येष्ठ शुद्ध चतुर्थी ! (२९ मे १६७४) महाराजांच्यावर पहिला संस्कार करण्यात आला. 'पुनर्भवसंस्कार विधी' ! हा संस्कार राजांचा पुनर्जन्माचा होता. उंबराचे एक प्रचंड खोड पोखरले. ढोली तयार केली. त्यात राजाला बसवले आणि अग्निच्या सानिध्यात मंत्रपठण झाले. राजा बाहेर आला तो नवीन होऊनच. राजांचा पुनर्जन्म झाला. मग त्यांची मौंज झाली. ते क्षत्रीय झाले. आता प्रायश्चित्त घेण्याचा अधिकार त्यांना मिळाला. आजवर जे संस्कार व्हायला पाहिजेत ते झाले नाहीत म्हणून 'लोप संस्कार प्रायश्चित्त' घेतले. दुसरे प्रायश्चित्त लढाईत मारलेल्या मनुष्य-वधा बद्दल होते. स्वराज्य स्थापायचे म्हणजे लढाई आली आणि त्यात अनेकांची हत्या करावी लागते. कदाचित त्यात स्त्री हत्या, गोहत्या होणेही शक्य आहे. त्यासाठी महाराजांनी तुला-दानाने प्रायश्चित्त घेतले. सोने, रूपे, तांबे, जस्त, कथील लोखंड या धातूंनी महाराजांची तुला झाली. त्यानंतर ताग. कापूर मीठ, जायफळ, जायपत्री मसाल्याचे पदार्थ, लोणी, साखर, फळे आदी खाद्य पदार्थांनी महाराजांची तुला झाली. या साऱ्या वस्तू नंतर गोरगरिबांना आणि ब्राह्मणांना वाटून टाकण्यात आल्या.

दुसऱ्या दिवशी म्हणजे ३० मेला (ज्येष्ठ शु ६) महाराजांचा सोयराबाईशी विवाह झाला. त्यांना पट्टराणी पदाचा मान

मिळाला. हा विवाहच आगळा. महाराजांच्या या विवाहाला त्यांच्या लकीसुना आणि पुत्र जावईही उपस्थित होते ?

या दिवशीच समारंभाचा प्रारंभ होता. यादिवशी विविध कार्यक्रम पार पाडले. गणेशपूजन, कलशसंस्थापन पुण्याहवाचन अभिसिंचन, षोडश मातृका पूजन, नांदी श्राद्ध आणि मधुपर्क हे सारे विधी क्रमवार झाले. शेवटी पट्टबंधन झाले. म्हणजे सारे विधी आणि संस्कार पूर्ण होईपर्यंत त्यांच्याशी निगडित राहण्यासाठी बांधलेले सूत्र.

राज्याभिषेक म्हणजे राजाच्या ठिकाणी देवाधिपती इंद्राचे अस्तित्व प्रस्थापित करणे. पुढचे सारे यज्ञ याग त्याला अनुसरून झाले. ज्येष्ठ शुद्ध सप्तमीला ' ऐंद्रीशांती ' विधी झाला. अष्टमीला गृहयज्ञ, नक्षत्र होम झाला. हा होम दोन दिवस चालला. नवमी निषिद्ध म्हणून वगळली. दशमीला हा यज्ञ पुरा झाला. एकादशीला, ' निर्ऋतीयाग ' पुरा झाला आणि द्वादशीला आतापर्यंतच्या यज्ञांची सांगता झाली. आता साऱ्यांचे लक्ष लागले होते राज्यारोहण समारंभाकडे मुहूर्त होता ज्येष्ठ शुद्ध त्रयोदशी ! (६ जून १६७४) शुक्रवारी मध्यरात्र उलटल्या नंतर. ब्राह्ममुहूर्तावर ! !

शुक्रवारी सायंकाळपासूनच राज्याभिषेकाच्या कार्यक्रमांना सुरुवात झाली. महाराज आणि महाराणी यांनी स्नान केले. ते मंडपात आले. प्रथम मंडपपूजा झाली. विघ्नहर्त्या गजाननाचे स्तवन झाले. कलश पूजन झाले. आता प्रथम ' ऐंद्र्याभिषेक ' त्या अभिषेकाच्या साहित्याची पूजा झाली. ऐंद्र्याभिषेकासाठी " विविध ठिकाणची मृदा (माती) जमा करून, तसेच विविध प्रकारचे उदक मिळवून, ते मंत्रयुक्त करून ठेवले होते. पर्वत शिखराच्या अग्रभागाची माती, वारुळातील माती, शिवालयातील

आणि विष्णु मंदिरातील माती, नदीतीरावरील माती, हत्तीच्या दातांनी उकरलेली माती, बैलाच्या शिंगांनी उकरलेली माती, गायीच्या खुराखालची माती, घोडयाच्या टापाखालची माती, रथाच्या चाखाखालची माती, सर्पाचा स्पर्श झालेली माती, अशी अनेक प्रकारची माती या साहित्यात होती. तसेच चंदनयुक्त उदक, पुण्योदक, पल्लवोदक, बीजोदक, रत्नोदक, फलोदक, औषध्युदक असे वेगवेगळच्या संपर्काचे पाणी तयार करून ठेवले होते." पंचामृतांचे कलश, गंगायमुनादी पवित्र नद्यांच्या पाण्याचे कलश, पवित्र तिर्थांचे कलश असे कितीतरी कलश तेथे होते. महाराजांनी त्या सर्व साहित्याची पूजा केली.

शुक्रवारची मध्यरात्र ! त्रयोदशी लागली. आणि अभिषेक कार्याला सुरुवात झाली. औदुंबर शाखांच्या आसनावर महाराज सपत्नीक बसले. मंत्रघोष चालू झाले. वेगवेगळच्या मृत्तिका महाराजांना लावल्या गेल्या. विविध प्रकारच्या जलांनी स्नान झाले. ' वेदमंत्राच्या उद्‌घोषात देवाधिपती इंद्राची प्रतिष्ठापना महाराजांच्या ठिकाणी केली गेली.

या ऐंद्र्याभिषेकानंतर महाराजांना अभिषेक शालेत नेले. तेथे अष्ट अमात्यांकरवी पंचामृत अभिषेक सुरू झाला. आणि सर्वांच्या मुखावर आनंदाची कारंजी थुई-थुई नाचू लागली. सनई चौघडयांचा आनंद गगनात मावेनासा झाला. तोफांची सरबत्ती सुरू झाली. वेदपठण, मंत्र घोष उच्चरवाने ऐकू येऊ लागले. दिशा कोंदाटल्या. पहाटेच्या तारकांनी हा आनंद सोहळा डोळे भरून पाहिला. पंचामृतानंतर पवित्र सरिता, सागर, तीर्थे या सर्व उदकांच्या धारा महाराज, महाराणी आणि युवराज यांच्या मस्तकावर धरल्या गेल्या आणि मंत्र पठणात अभिषेक पुरा झाला. आता महाराज अभिषिक्त भूमिपती बनले.

अभिषेकानंतर नूतन वस्त्रे परिधान करून महाराज सभामंडपात आले. साऱ्यांनी नेत्रांच्या निरांजनांनी महाराष्ट्राच्या या अभिषिक्त सम्राटाला ओवाळले. सगळीकडे आनंदी आनंद दाटून राहिला होता.

महाराजांना शत्रू निर्दालनासाठी आचार्यांनी धनुष्य, बाण, खड्ग ही आयुधे दिली. भूमीपालनासाठी रथ दिला. सभामंडपाला त्यांनी रथातून एक प्रदक्षिणा केली. महाराज सभामंडपात आले. राजसभेच्या बाजूला दोन हत्ती झुलत होते. चौघडा झडत होता. सारा आसमंत हंड्या झुंबरांनी उजळून निघाला होता. तो प्रकाश साऱ्यांच्या मुखावर विलसत होता आणि त्यातून त्यांचा आनंद ओसंडून वाहत होता. बत्तीस मण सोन्याचे सिंहासन शुभ चिन्हांनी झळकत होते. डाव्या उजव्या बाजूला अष्टप्रधान हाती सुवर्णमुद्रा घेऊन उभे होते.

महाराज आले. त्यांनी त्या पूर्वाभिमुख सिंहासनाला वंदन केले आणि पाय न लावता ते त्याच्यावर आरूढ झाले. तेवढ्यात गागाभट्टांनी त्यांच्या मस्तकावर छत्र धरले. उच्च स्वराने ललकारी दिली "क्षत्रिय कुलावतंस सिंहासनाधीश्वर श्री शिव छत्रपती महाराज !!" आणि सभागृहानेही त्याला प्रतिसाद दिला. शिव छत्रपतींच्या जयजयकाराने आसमंत भरून गेला. अष्टप्रधानांनी सुवर्णमुद्रांचा अभिषेक केला. सुवासिनींनी पंचारती ओवाळल्या. तोफांची सलामी झाली. महाराष्ट्र सनाथ झाला. त्याला 'राजा' मिळाला. मानकऱ्यांचे मुजरे झडले आणि तिकडे उगवत्या सूर्यानेही महाराष्ट्राच्या या सार्वभौम राजाचे हसतमुखाने स्वागत केले. आपल्या सहस्र किरणांनी आशीर्वाद दिले. सूर्याचे किरण चराचरावर पसरले आणि अंधःकारच नाहीसा झाला.

या आनंदाच्या सोहळ्याला पूर्णता दिली कवीराज भूषण याने ! त्याने शिवचरित्रावरील 'शिवराज–भूषण' हे काव्य राज्याभिषेकानंतर थोड्याच दिवसात पूर्ण केले. अन्याय, दंभ यांनी बरबटलेल्या राजा महाराजांची, बादशहांची कवने गाऊन भ्रष्ट झालेल्या जिव्हेला पावित्र्य लाभावे म्हणून तो शिवराजां-कडे आला. शिवरायांची कीर्ती आधीच त्याच्या कानी पोहचली होती. त्याने गोब्राह्मण प्रतिपालक शिवरायांचे सालंकृत काव्यमय चरित्र लिहिले. भूषण खरोखरच कवी 'भूषण' होता.

भूषण लहानपणी उनाड होता. त्याचे तिन्ही भाऊ कर्तेसवरते होते. मिळवून आणीत होते. नुसता ऐतखाऊ होता तो भूषण ! पण, बुद्धीने अत्यंत हुषार होता. तसाच मानीही होता.

एक दिवस आला, सारा मोहरा फिरून गेला. सुप्त निखा-ऱ्यावर फुंकर बसली. भूषण आपल्या भावांबरोबर जेवत होता. थोरली भावजयी वाढत होती. त्याने मागितले मीठ ! खरं म्हणजे साधी गोष्ट, पण भूषण ऐदी. थोरल्या भावजयीला हे खटकत होतं. ती म्हणाली,

"भावजी, जेवणात मीठ ते किती क्षुल्लक; पण तेवढे मिळ-वायची तरी अक्कल आहे का तुम्हाला ?"

शब्द जिव्हारी झोंबले. अपमान लागला. त्याने ताट दूर सारले. तसाच उठला आणि म्हणाला,

"वहिनी, तुम्ही म्हणता ते खरं आहे. मला 'मीठ' मिळ-वायची जेव्हा अक्कल येईल तेव्हाच पुन्हा परत येईन."

भूषणने ते शब्द खरे केले. गुरुगृही जाऊन अभ्यासाचा 'श्रीगणेशा' केला. कुशाग्र बुद्धी, चिकाटी, जिद्द या गोष्टी असल्यावर अशक्य काय आहे ? प्रयत्न केल्यावर वाळूच्या

कणातूनही तेल निघतं. मग विद्या प्राप्त न व्हायला काय झालं ? सरस्वती देवीलाही हुषार प्रामाणिकपणे अभ्यास करणारी, जिद्द आणि चिकाटी असणारे विद्यार्थी आवडतात. त्यांनी ' विद्येचे ' ' अर्थी ' विद्या मिळविणारे बनले पाहिजे. सरस्वती भूषणवर प्रसन्न झाली. एका उनाड मुलाचं ' कविराजात ' रुपांतर झालं. प्रयत्नाने पत्थरातून सुंदर शिल्प तयार झाले. शिवरायांच्या पदरी येऊन त्याने ' शिवराज भूषण ' काव्य रचून दिगंत कीर्ती मिळवली. नाव अजरामर केलं.

रायगडावर असा आनंदी आनंद साजरा झाला. संन्यास घेतलेल्या योग्यांनाही आनंद झाला. रामदासासारखे जोगी आनंदाने उद्गारले, " स्वप्नी जे जे देखिले रात्री ! ते ते तैसेचि होतसे ! आनंद झाला भुवनी ! आनंद वन भुवनी ! ! " पाहुण्यांची गर्दी ओसरू लागली.

पावसाळी दिवस. मासाहेबांना गडावरची हवा मानवेना. वय झालेलं. जीवनातल्या कृतार्थतेचा क्षण वृद्ध नेत्रांनी टिपला होता. शिवबा ' राजा ' झालेला डोळे भरून पाहिला होता. आता आणखी काय पाहिजे होतं ? छे, काही नको होतं. जीवन धन्य झालं होतं. कृतार्थ झालं होतं. आईसाहेब पाचाडला जायला निघाल्या. रायगडच्या बुरजांनी भावनार्द्रतेने विचारले. " मांसाहेब ... आता परत येणे ?" ते वृद्ध शरीर म्हणले असेल. " बाबांनो, आता कैचे येणे ? " पालखी पाचाडकडे रवाना झाली, आणि रायगडाने मांसाहेबांचे दर्शन घेतले ते अखेरचेच ! !

पाचाडला गेल्यावर मांसाहेबांची प्रकृती बिघडली. जीवन ज्योत थकली, अन् ज्येष्ठ वद्य नवमीला (१७ जून १६७४) ती शांत झाली. महान पराक्रमी पुत्र जवळ असतानाही मृत्यूने झडप घातली. मांसाहेब त्यांच्या लाडक्या शिवबाला सोडून गेल्या. महाराज पोरके झाले. अनेकांना आधार देणारे छत्रपती निराधार झाले.

आणि, अशीच निराधारपणाची जाणीव नानासाहेब पेशव्यांना भाऊसाहेबांच्या निधनाने झाली.

पानिपतावर भाऊसाहेबांनी प्रयत्नांची शर्थ केली. आभाळ फाटलं तरी ठिगळ लावण्याचा प्रयत्न केला. विश्वासराव गोळी लागोन पडले. खाशा लोकांनी परतण्याचा सल्ला दिला; पण भाऊसाहेब म्हणजे मूर्तिमंत धैर्य ! अखेर पर्यंत लढले. शे–दोनशे लोकांवर दहाहजार गनिमांनी हल्ला केला. धुराळ्याचे लोट उठले. हाणा–मारा शब्दांनी आकाश भरून गेले आणि त्यात भाऊसाहेबांची गत काय झाली ते कळलेच नाही. भाऊसाहेब गेले पानिपतावर चंड पराभव पत्करावा लागला; आणि ही बातमी नानासाहेबांना समजली. त्यांना जबरदस्त धक्का बसला. धीर खचला, 'भाऊ'चा सतत ध्यास घेतला. प्रकृती क्षीण होत चालली, बंधुशोक अनावर झाला. हवा बदलण्यासाठी ते पर्वतीवर आले; पण आयुष्याची सीमा झाली तेथे काय करणार ? "भाऊ भाऊ..." म्हणत मराठ्यांच्या या कर्तबगार पेशव्याने आपला प्राण सोडला ! ती तिथी होती ज्येष्ठ वद्य नवमी ! !

माधवरावांनी या पराभवाचा कलंक धुऊन काढला पण त्यांच्यानंतर इंग्रजांनी जोर धरला. हळू हळू मराठी राज्य अस्तास जाऊ लागले. ज्येष्ठ वद्य चतुर्दशी (सन १८१७) या दिवशी बाजीरावाने इंग्रजांशी तह करून राज्याची इतिश्री जवळ आणली. तो एक छोटा संस्थानिक बनला. लवकरच मराठी राज्यही संपले. डलहौसीने संस्थाने खालसा करण्याचा सपाटा चालवला. त्यात 'झाशी' संस्थानाचाही समावेश होता.

राणी लक्ष्मीबाईने दत्तक मुलगा घेतलेला असतानाही संस्थान खालसा झाले. आपली झाशी आपल्या दत्तक मुलाला मिळावी म्हणून तिने खूप प्रयत्न केले पण उपयोग झाला नाही. राणीला साठ हजार रुपयांचे वर्षासन नेमून दिले. नदीतल्या पाण्याने

नदीला अर्घ्य ! केवढी उदारता !! राणी चिडली. आधी पति-निधनाचे दु:ख. त्यात झाशी गेली. संस्थानातला देवदेवतांवरचा खर्च इंग्रजांनी बंद केला. गोहत्या राजरोस सुरू झाली. धर्मावरही गदा !! आधीचा अपमान आणि आता देवधर्माचा अपमान. आगीत तेल पडले. राणी संतापली. चवताळली. नागिणीसारखी ! हा अपमान कदापि सहन केला जाणार नाही. राणीने प्रतिज्ञा केली, "हातात तलवार आणि कुडीत प्राण असेपर्यंत झाशी माझी आहे." तिने लपवलेल्या तोफा, दारूगोळा बाहेर काढला. हा हा म्हणता मोठे सैन्य तयार झाले. ती स्वत: रणदेवीसारखी, स्वातंत्र्य लक्ष्मीसारखी तेजाने तळपू लागली. इंग्रजी सैन्याची कत्तल झाली आणि तिने झाशी स्वतंत्र केली. आपली आवडती झाशी तिने परत मिळविली. पण हा आनंद फार काळ टिकला नाही. ही सावली, आभाळाची सावली ठरली. इंग्रजांना हे वृत्त समजताच ते संतापले. चिडले, बेभान झाले; आणि त्यांचे प्रचंड सैन्य झाशीच्या दिशेने निघाले.

सैन्याने निकराची लढाई सुरू केली. तोफा धडाडू लागल्या. राणीने शौर्याची कमाल केली सैन्याला धीर देत ती रणांगणावर विजेसारखी तळपत होती. अकरा दिवस युद्ध चालले पण बळ अपुरे पडले. झंझावातापुढे टिकाव लागला नाही. इंग्रजांचा जय झाला; आणि तरीही राणीने धीर सोडला नाही. तिने दत्तक मुलाला घेतले. पाठीशी बांधले. ती घोड्यावर स्वार झाली आणि तिने तटावरून घोडा फेकला. आषाढ महिन्यातल्या काळ्याकुट्ट ढगात लख्कन वीज चमकली ! डोळे दिपले. राणी वायुवेगाने दौडू लागली.

सर ह्यू रोज् तिचा पाठलाग करू लागला. काल्पी गावी पुन: युद्ध झाले अन् पुन: पराभव झाला. एवढेच नव्हे राणीला मदत करणाऱ्या नानासाहेब पेशव्यांचा, तात्या टोप्यांचाही पराभव

दमा आणि देशकार्यात ज्येष्ठ वद्य दशमीला शांत झाली. अनेकांना प्रकाश देऊन ती ज्योत विझली.

या ज्योतीबरोबरच आठवण येते ती मानवतेचा प्रकाश देणाऱ्या ज्योतीची! मातेचे महन्मंगल स्तोत्र गाणाऱ्या साने गुरुजींची!! साने गुरुजी हे एक थोर साहित्यिक होते. तळमळीचे कार्यकर्ते होते आणि शुचितेचे उपासक होते. १९३० नंतरचे आपले आयुष्य त्यांनी देशाला अर्पण केले. त्यांची ध्येयनिष्ठा जाज्वल्य होती. त्यांनी सहा वेळा तुरुंगवास भोगला. त्यांच्या देशप्रेमाला तोड नव्हती.

'शामची आई' हे त्यांचे पुस्तक मराठी साहित्यात अजरामर झाले आहे. त्यांची वृत्ती संकोची होती अन् वक्तृत्व प्रभावी होते. ते एखादी कथा सांगायला लागले की तन्मय होत. कथेच्या ओघात एखादा संदेश असा सुरेख सांगतात की चटकन हृदयाला भिडतो. "शाम, पायाला घाण लागू नये म्हणून जपतोस तसाच मनाला घाण लागू नये म्हणून सतत जपत जा हो!" अशी कितीतरी वाक्ये त्यांच्या लेखनाशी एकरूप झाली आहेत. दुधात साखर एकरूप व्हावी तशी!

त्यांच्या देशसेवेबद्दल त्यांना एक लाख रुपयांची थैली देण्यात आली होती. ती त्यांनी राष्ट्र कार्यासाठी देऊन टाकली. अस्पृश्यांच्या मंदिर प्रवेशासाठी उपवास, प्रयत्न त्यांनीच केले होते. 'साधना' साप्ताहिकाचे संस्थापकही तेच होते. 'भारतीय संस्कृति' हे पुस्तकही सरस उतरले आहे. अशा या लेखकाने मानवतेच्या पाईकाने, तळमळीच्या कार्यकर्त्याने आपण होऊन या जगाचा निरोप घेतला तो ज्येष्ठ वद्य एकादशीला! गुरुजी गेले तरी, 'शामच्या आई' च्या रूपाने त्यांनी महाराष्ट्रीयांच्या मनात अढळ स्थान मिळविले आहे. ते चिरंतन राहील.

याच महिन्यात भारत आणखी दोन मौल्यवान रत्नांना मुकला एक राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे जनक डॉ. हेडगेवार आणि दुसरे म्हणजे त्याच संस्थेचे सरसंघचालक पू. गोळवलकर गुरुजी ! !

" डॉक्टर लहानपणापासूनच एक उच्चतम ध्येय डोळ्यासमोर ठेवून वागत असत. अठरा वर्षे सतत विचार आणि तपश्चर्या केल्यानंतरच त्यांनी एक विचारसरणी निश्चित करून राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची स्थापना केली. त्यांनी आपली विचार पद्धती व कार्यपद्धती अशा कुशलतेने रचलेली आहे की, पक्षोपक्षांचे वैमनस्य टाळून व सर्व प्रकारच्या पक्षभेदांपासून अलिप्त राहून संघकार्याची अखंडितपणे प्रगतीच होत रहावी.


" हिंदुच्या अवनतीचे मूळ त्यांच्या मनोदौर्बल्यात आहे हे डॉ. हेडगेवार यांनी सांगितले, व वैयक्तिक संसाराची तमा न बाळगता आसेतु हिमाचल हिंडून संघटनेचा महिमा व तंत्र भारतीय समाजाच्या अंतःकरणावर खोल बिंबविले." अशा या थोर विचारवंताचा, कुशल संघटकाचा आणि संस्कृति सेवकाचा अंत ज्येष्ठ वद्य द्वितीया (२१ जून १९४०) या दिवशी झाला.

'आपल्यानंतर या संघटनेचे काय होणार' ह्या प्रश्नाने त्यांना तसे भेडसावले नाही कारण पू. माधवरावजी गोळवलकर यांनी त्या संस्थेची धुरा समर्थपणे वाहिली. संघाची शाखा देशाच्या कानाकोपऱ्यापर्यंत पोहचवली. गुरुजी स्वतः अत्यंत हुषार होते. तत्वाचिंतक होते. उत्कृष्ट वक्ते होते. शिस्तीचे भोक्ते होते. त्यांचे जीवन ऋषितुल्य आदर्श जीवन होते. संघावर १९४८ साली बंदी आली त्या वेळेला त्यांनी दाखविलेली शांत वृत्ती,संयम आणि त्या काळात संघटनेवरचे आक्षेप घालविण्यासाठी केलेले परिश्रम मोलाचे होते. असे हे महान नेते याच महिन्यात ज्येष्ठ शुद्ध पंचमीला (५ जून १९७३) वयाच्या ६७ व्या वर्षी सर्वांना सोडून गेले. त्यांच्या निधनाने भारत एका थोर राष्ट्रभक्ताला,

निस्सीम समाजसेवकाला व हिंदुसंस्कृतीच्या एका महान भाष्यकाराला मुकला आहे.

या महिन्यात आणखी एक नोंद करावी लागेल ती म्हणजे अंतर्गत सुरक्षिततेसाठी राष्ट्राध्यक्षांनी ज्येष्ठ वद्य तृतीयेला (२६ जून १९७५) ला आणीबाणी पुकारली. आणि त्याचाच एक भाग म्हणून राष्ट्रीय स्वयंसेवक संघ, जामाते इस्लाम आदी संघटनांवर बंदी घातली. ती ज्येष्ठ वद्य दशमीला! (४ जुलै १९७५)

येणारा पुढे जात असतो हा सृष्टीचा चिरंतन नियम आहे. ज्येष्ठ तरी त्याला अपवाद कसा असणार? या साऱ्या स्मृती आपल्या हृदयात साठवत. तोही पुढे सरकत असतो. नवीन येणाऱ्या आषाढाचे स्वागत करायला तयार असतो. आकाशात असणारे पांढरे ढग काळे बनतात. काळे ढग म्हणजे शेतकऱ्यांचा आनंद! त्यांना पाहताच त्यांचे मनमयुर आनंदाने नाचू लागतात. वारा आपला वेग वाढवतो. वर्षाराणींच्या स्वागतासाठी वृक्ष आपला पानांचा साज पुन्हा एकदा बदलतात आणि ज्येष्ठाला निरोप देत देत आषाढ धरणीवर अवतरतो.



BVBK-0400894

## ज्येष्ठ-दिनविशेष

ज्येष्ठ शुद्ध १ श्रीराम–हनुमंत भेट.
" २ हळदीघाटाचा घनघोर संग्राम, शके १४९८
" ३ राणा प्रतापसिंहाचा जन्म, शके १४६२
" ४ शिवयांची मुंज, शके १५९६
" ५ सालबाईचा तह, शके १७०४
" ५ प. पू. माधवरावजी गोळवलकर यांचे निधन, शके १८९५
" ६ जसवंतसिंहाने सिंहगडचा वेढा उठविला, शके १५८६
" ७ झाशीच्या राणीचे स्वातंत्र्य समरात आत्मबलिदान, शके १७८०
" ८ श्रीरामांनी वालीचा वध केला.
" ९ परशुरामपंत प्रतिनिधींचे निधन, शके १६४०
" ९ गुरुदेव रा. द. रानडे यांचे निधन, शके १८७९
" १० गंगा नदीचे अवतरण,
" ११ शिवरायांची सुवर्णतुला, शके १५९६
" ११ डॉ. शामाप्रसाद मुखर्जींचे निधन, शके १८७५
" १२ संभाजी राजे यांचा जन्म, शके १५७९
" १३ छत्रपती शिवाजी महाराजांना राज्याभिषेक, शके १५९६
" १४ सत्तावनच्या स्वातंत्र्यसमरातील कानपूर लढ्याला सुरुवात, शके १७७९
" १५ महात्मा कबीरांचा जन्म, शके १३२१
" १५ शहाजी राजांची सुटका, शके १५७१
ज्येष्ठ वद्य १ रणजितसिंगांचे निधन शके १७६१
" २ डॉ. हेडगेवार यांचे निधन, शके १८६२
" ४ टिपूविरुद्ध त्रिवर्गाचा तह, शके १७१२

| | | |
|---|---|---|
| " | ६ | नानासाहेब पेशव्यांचे निधन, शके १६८३ |
| " | ६ | विवेकानंद समाधिस्त झाले, शके १८२४ |
| " | ७ | जयाप्पा शिंदे यांचा खून, शके १६७७ |
| " | ७ | हरिपंत फडके यांचे निधन, शके १७१६ |
| " | ९ | राजमाता जिजाबाईचा अंत शके १५९६ |
| " | ९ | मंडाले तुरुंगातून लो. टिळक सुटून पुण्यात आले, शके १८३६ |
| " | १० | आगरकर यांचे निधन, शके १८१७ |
| " | ११ | चित्तरंजनदास यांचे निधन, शके १८४७ |
| " | ११ | साने गुरुजी यांचे निधन, शके १८७२ |
| " | १२ | निवृत्तीनाथ समाधिस्त झाले, शके १२१९ |
| " | १३ | 'शिवराज-भूषण' काव्याची समाप्ती, शके १५९६ |
| " | १४ | मराठी राज्य इंग्रजांनी घेतले, शके १७३९ |
| " | ३० | दुसऱ्या बाजीरावाची मुलगी कुसुमावती यांचे निधन, शके १८३९ |

## संदर्भ-ग्रंथ

१) संस्कृतिसमवाय — श्रीमती वत्सला भाटे
२) आर्यांच्या सणांचा इतिहास — 'ऋग्वेदी'
३) जिवंत व्रतोत्सव — काका कालेलकर
४) भारतीय सण व उत्सव — सौ. कुमुदिनी रांगणेकर
५) ऋतुचक्र — श्रीमती दुर्गा भागवत
६) पक्षिदर्शन — डॉ. म. वि. आपटे
७) दिनविशेष — डॉ. प्र. न. जोशी
८) शिवराज्याभिषेक (लेख) — म. वि. सोवनी
९) भारतीय संस्कृति — साने गुरुजी
१०) संस्कृति-कोश — पं. महादेवशास्त्री जोशी